## नियमीत दिवाणी दावा क्र ३२/२०१५

## आदेश निशाणी ५२ खाली

१ वादींनी दिवाणी प्रक्रिया संहितेच्या आदेश ६ क्र १७ नुसार दाव्यात दुरुस्ती करण्यासाठी हा अर्ज सादर केला आहे

२ वादींचे संक्षिप्त कथन खालीलप्रमाणे:

दावा कलम १ मध्ये दावा मिळकतीचे वर्णन या सदरी क्षेत्र ०३ हेक्टर ५५ आर पो.ख. १४ व आकार रुपये १२ पैसे २० ऐवजी नजरचुकीने क्षेत्र . ३ हेक्टर ७९ आर व आकार रुपये १ पै. १० असे करण्यात आले आहे सदर दुरुस्तीमुळे दाव्याच्या मुळ स्वरुपात बदल होणार नाही. सदरची दुरुस्ती ही तांत्रिक स्वरुपाची असल्याने प्रस्तुतचा दावा दुरुस्तीचा अर्ज मंजूर करण्यात यावा.

३ प्रस्तुत अर्जास प्रतिवादी क्र २,४ व ५ यानी , केवळ दावा प्रलंबित ठेवण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज देण्यात आला आहे सबब तो नामंजूर करण्यात यावा. सदरचा अर्ज मंजूर करण्यात आल्यास जास्तीत जास्त खर्चासह मंजूर करण्यात यावा असे म्हणणे दिले आहे

४ प्रकरणाची कागदपत्रे अभ्यासली. वादीचे विद्वान वकील श्री के एम घाडगे आणि प्रतिवादी क्र २,४ व ५ यांचे विद्वान वकील श्री एस जी साठे यांचा युक्तिवाद ऐकला. त्यावरुन मी खालील मुददे निश्चित केले आणि त्यावर माझे निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत.

| मुददे | निष्कर्ष |
|---|---|
| १.अर्ज निशाणी ५२ मंजूर करुन नमूद दुरुस्ती वाद पत्रात करुन मिळण्यास वादी पात्र आहेत काय ? | होकारार्थी |

| | |
|---|---|
| २ काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारण मिमांसा

**मुददा क्र १ साठी:**

५ वादीने प्रस्तुत अर्जात मागणी केलेली दुरुस्ती ही तांत्रिक स्वरुपाची असल्याचे दिसुन येते. सदरची दुरुस्ती मंजूर केल्यास दाव्याच्या स्वरुपात कोणताही बदल होणार नाही. सबब प्रस्तुतचा दावा दुरुस्तीचा अर्ज मंजुर करणे न्यायसंगत राहिल. त्यामुळेच मी मुददा क्र १ चे उत्तर होकारार्थी देतो.

**मुददा क्र २**

६ मुददा क्र १ चे होकारार्थी उत्तर पहाता मुददा क्र २ चे उत्तर मी अंतिम आदेशाप्रमाणे देतो

## आदेश

१ अर्ज निशाणी ५२ मंजूर करण्यात आला आहे.

२ वादींनी वादपत्रात सदर दुरुस्ती आजपासून १४ दिवसाच्या आत करावी व वादपत्राची दुरुस्त प्रत सादर करावी

दिनांक ०८.०६.२०१५

( हे. भा. सिरसाळकर)
दिवाणी न्यायाधीश व.स्तर पंढरपूर.